# वसई-विरार शहर महानगरपलिका

प्रभाग समिती "ई"

ता. वसई जि. पालघर

---

जा.क्र. वविशम/साप्रवि/ ९८० /२०१७-१८

दिनांक:- ०६ /११/२०१७

## जाहिर दरपत्रक

याव्दारे सर्व पेट्रोल चेन सॉ विक्रेते, पुरवठादार, संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यात येते की, महानगरपालिकेच्या प्रभाग समिती "ई" कार्यालयाकरीता खालील नमूद तपशिलाप्रमाणे मशिन खरेदी करावयाच्या असून त्याकरीता दिनांक /११/२०१७ रोजी दु.४.०० वाजता बंद पाकिटातून दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | साईज | खरेदी नग |
|---|---|---|---|
| १ | मकिटा कंपनीचे पेट्रोल चेन सॉ मॉडेल क्र.DCS 7301/DCS 7300 | चेन साईज २४ इंच लांब | ३ नग |

### अटी व शर्ती

१) पुरवठादाराने स्वतःचे लेटर पॅडवर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर वस्तु व सेवा कर (जीएसटी) क्रमांक असणे बंधनकारक राहील.

२) मालकाचे /संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे.

३) दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर ७ दिवसात कार्यालयात उपस्थित राहून करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

४) दरपत्रकात नमुद वस्तुंचे / साहित्यांचे दर हे सादर करतांना मुळ किंमत, जीएसटी, वाहतुक खर्च वेगवेगळे दर्शविण्यात यावेत.

५) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा. उप-आयुक्त यांना राहिल.

६) वरील अटींचे पालन जे पुरवठादार करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येतील.

७) यासंबंधीची दरपत्रके स्वतःचे लेटरपॅडवर बंद पाकिटातुन दिनांक १५ /११/२०१७ रोजी दु. ४.०० वाजता प्रभाग समिती "ई" येथील आवक जावक विभागामध्ये सादर करावीत.

८) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक १५ /११/२०१७ रोजी दु. ४.३० वाजता सहा. आयुक्त प्रभाग समिती "ई" यांचे दालनात उपस्थित दरपत्रकदार अथवा त्यांचे प्रतिनिधी हयांचे समक्ष उघडण्यांत येतील.

स्थळ :- वसई-विरार शहर महानगरपालिका,
प्रभाग समिती "ई"

दिनांक :- ६ /११/२०१७

उप-आयुक्त (अग्निशमन)
वसई-विरार शहर महानगरपालिका